# MT - 162

**Seat No.** | | | | | | | |

2019 ___ ___ 1100

**MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM - I - PAPER - III**

**Time : 3 Hours** **(Model Answer Paper)** **Marks : 100**

**विभाग – १ : गद्य**

**पठित गद्य**

उ.१ (अ) **खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) (i) **आकृतिबंध पूर्ण करा.** १

सुकलेल्या नाल्यात उतरताना माझ्या मनावर एक <u>अनामिक</u> दडपण आलं होतं.

(ii) **आकृतिबंध पूर्ण करा.** १

**सगळ्यात धोकादायक जनावर!**

↓

लहान पिल्लं असणारी वाघीण

(२) **दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्यायांची निवड करून वाक्य पूर्ण करा.** १

(i) आम्ही सगळ्यांनीच एकमेकांकडं बघत चौकस राहण्याची डोळ्यांनीच <u>खूण करून सूचना केली.</u>

(ii) **चूक की बरोबर ते लिहा.** १

चूक

(३) **व्याकरण :**

(i) **काळ ओळखा.** १

भूतकाळ.

(ii) **लिंग बदला.** १

(अ) वाघ - वाघीण (आ) बोका - मांजर

**(४) स्वमत :** २

वाघीण चारही पिल्लांना वाघ, बिबळा, रानकुत्री यांच्यापासून धोका असल्याने नाल्याकाठच्या जांभळीच्या दाट झुडपात लपवून शिकारीला गेली होती. तिने पिल्लांसाठी खास खबरदारी घेतली होती. ती रात्रभर जंगलात फिरून पिल्लांजवळ परत आली. आईची हाक ऐकताच अजूनवर दडून बसलेली पिल्लं खेळकरपणे तिच्याकडे झेपावली. थकलेली वाघीण पाण्यात विश्रांतीसाठी बसली. पण पिल्लांना आईला बघून उधाण आले. त्यातील एका पिल्लाने वाघिणीच्या पाठीवरच उडी घेतली. तिथून ते घसरले व धपकन पाण्यात पडले. वाघिणीच्या तोंडावर पाणी पडल्याने तिने नापसंती व्यक्त केली. पण पिल्ले खेळतच होती. आईच्या भोवती दंगाधोपा चालू होता. एकमेकांचा पाठलाग करणे, पाण्यात उड्या मारणे, आईला मायेने चाटणे असे खेळ चालू होते. आईच्या भेटीने लपवून ठेवलेली पिल्ले मनमोकळेपणाने खेळत होती.

उ.१ **(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) (i) आकृतिबंध पूर्ण करा.** १

**तपोवनातील स्त्रिया अब्दुलची आतुरतेने या दिवशी वाट पाहत**

- संक्रांतीला
- ज्येष्ठ पौर्णिमेला

**(ii) एका वाक्यात उत्तर लिहा.** १

तपोवनातील स्त्रियांना बांगड्या भरण्याची कला अब्दुलला साधली होती.

**(२) (i) आकृतिबंध पूर्ण करा.** १

**तपोवन से चिठ्ठी आयी है आपको."**

- **कोण** → रघुभैया
- **कोणास** → अब्दुलला

**(ii) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** १

साऱ्या <u>तपोवनासाठी</u> तो एक आनंदाचा आणि चैतन्याचा दिवस!

**(३) व्याकरण**

**(i) अधोरेखित शब्दांची जात ओळखा.** १

भरू लागला - क्रियापद

(ii) **खालील शब्दांचे सामान्यरूप लिहा.** १

(अ) दिवस - दिवसा (आ) चैतन्य - चैतन्या

**(४) स्वमत** २

अब्दुल तपोवनात गेला की चुडीऽवाला आला, चुडीऽऽवाला आला असे म्हणत सगळ्या बायका-मुली त्याच्या भोवती जमत असत. प्रत्येकीला अब्दुलकडून आपल्याला हव्या असलेल्या वस्तू, रंगीबेरंगी बांगड्या हव्या असत. प्रत्येकीला प्रथम बांगड्या भरायच्या असत म्हणून अब्दुलच्या भोवती त्या गर्दी करत असत. त्यांचा आवाज, गडबड, गोंधळ यामुळे आनंदवनाचा परिसर गजबजून उठे. सगळ्या स्त्रियांमध्ये आनंद आणि चैतन्य पसरत असे. तो सगळा अनुभव म्हणजे अब्दुलसाठी अत्यंत समाधानाची गोष्ट होती.

## अपठित गद्य

उ.१ **(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) खालील कृती पूर्ण करा.** २

(i) **यांच्या पायावर एक कुटुंब निर्माण करणे मनुष्यत्वाचे ध्येय.**

- स्वातंत्र्य
- बंधुत्व
- समता

(ii) **सर्व मानवांना परमेश्वराने दिलेले स्वातंत्र्य**

- धार्मिक
- राजकीय

**(२) उत्तरे लिहा.** २

(i) ऐहिक जीवनाचा, विश्वातील वस्तूंचा यथेच्छ उपभोग घेणे.

(ii) शेतकी, कला-कौशल्य, मजुरी.

**(३) व्याकरण**

**खालील तक्ता पूर्ण करा.** २

| शब्द | मूळशब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती प्रकार |
|---|---|---|---|
| परमेश्वराने | परमेश्वर | ने | तृतीया (एकवचन) |
| मानवांना | मानव | ना | चतुर्थी (अनेकवचन) |

(४) **स्वमत** २

संविधानाने भारतातील प्रत्येक नागरिकास स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, राष्ट्रप्रेम इत्यादी हक्क दिले आहेत. मनुष्याने त्या हक्कांचा वापर स्वत:चा स्वार्थ पूर्ण करून घेण्यासाठी करू नये. आपल्या हक्कांचा वापर करून कोणाचे नुकसान करू नये. भारतदेशाची अखंडता टिकावी, धार्मिक सलोखा अखंड राहावा, सर्वांनी समाधानाने आणि एकत्वाने येथे नांदावे अशा करीता आपल्या हक्काचा वापर मनुष्याने करावा. मनुष्याला सुख प्राप्त व्हावे. कोणावरही अन्याय होऊ नये, प्रत्येकाच्या गरजा भागाव्यात, प्रत्येकाला समान वागणूक मिळावी यासाठीच तर भारतीय राज्य घटनेने आपल्याला समान हक्क दिले आहेत. त्या हक्कांची पायमल्ली होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी. एक सुजाण, जबाबदार नागरिक बनावे.

## विभाग – २ : पद्य

उ.२ (अ) **कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) (i) **आकृतिबंध पूर्ण करा.** १

**कवी नारायण सुर्वे हिशोब करतात**
↓
डोईवर राहिलेल्या उन्हाळ्यांचा

(ii) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकाम्या जागा भरा.** १

झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले.

(२) **आकृतिबंध पूर्ण करा.** २

(i) **कवीचे आयुष्य असे होते**
↓
दु:खाचे | दारिद्र्याचे

(ii) **दुनियेचा विचार करण्याचा परिणाम**
↓
कवी जगमय झाला

| | | |
|---|---|---|
| | (३) गरिबीत जीवन जगत असलेले नारायण सुर्वे जगाच्या प्रचंड मोठ्या शाळेत शिकत होते. रोजचे नव-नवे दाहक अनुभव, अपमान, उपेक्षा, भूकेचा संघर्ष, कधी प्रेमाचा ओलावा तर कधी तिरस्काराचा फटकारा सहन करत होते. या रोजच्या अनुभवातून ते खूप काही शिकत होते. धडपडत होते, निराश होत होते, पण जगणं निरंतर सुरू होतं. त्यांच्या भोवतीच जग म्हणजे त्यांच्यासाठी एखाद्या मोठ्या प्रचंड तप्त भट्टीसारखं होतं. जसं भट्टीत पोलाद तप्त होत आणि मजबूत होऊन बाहेर पडतं. अगदी त्याचप्रमाणे कवी नारायण सुर्वे दु:ख, दारिद्र्याशी सामना करत जीवन जगण्यासाठी नव्या उमेदीने तयार होत. | २ |
| | (४) माणसाच्या जीवनात सुख आणि दु:ख या दोन गोष्टी सदैव असतात. कधी सुखाचे दिवस असतात, तर कधी दु:खाचे. असे असले तरी कोणताही काळ हा कायम राहत नाही. दु:खातून माणूस अनेक गोष्टी शिकतो व उद्याच्या चांगल्या दिवसाची अपेक्षा करत जगत राहतो. माणसाने कवी सारखं आशावादी राहिलं पाहिजे. दु:खातही सुख येईल अशी आशा बाळगली पाहिजे, म्हणजे जगणं सोपं होतं. | २ |
| उ.२ | **(आ) 'योगी सर्वकाळ सुखदाता' व 'औक्षण' या दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.** | |
| | (i) **योगी सर्वकाळ सुखदाता** | |
| | **(१) कवी/कवयित्री : –**<br>संत एकनाथ | १ |
| | **(२) कवितेचा रचनाप्रकार : –**<br>'योगी सर्वकाळ सुखदाता' ही कविता एक 'अभंग' आहे. | १ |
| | **(३) कवितेचा काव्यसंग्रह : –**<br>'योगी सर्वकाळ सुखदाता' हा अभंग 'एकनाथी भागवत' शासकीय प्रत' या संग्रहातून घेतला आहे. | १ |
| | **(४) कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायी भाव) : –**<br>'योगी सर्वकाळ सुखदाता' या अभंगातून 'शम (शांती)' हा स्थायी भाव दिसून येतो. | १ |
| | **(५) कवितेतील आवडलेली ओळ : –**<br>जळ वरीवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।।<br>उदक करी सुखी एकवेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।। | २ |

| | | |
|---|---|---|
| | **(६) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे : –**<br>संत एकनाथांनी योगी पुरूष आणि पाणी यांचे समाजासाठीचे योगदान दाखवून दिले आहे. चंद्रकिरण व चकोर, पांखोवा व पिल्ले, जीवन (पाणी) व जीव या उदाहरणांच्या अप्रतिम वापराने मनातील भाव समर्पकरित्या व्यक्त झालेला आहे. त्यामुळे हा अभंग मनापर्यंत पोहोचतो. मेघांचे रूपक घेऊन योगी पुरूषांचे खालुते येणे ही एकनाथ महाराजांनी योजलेली कल्पना मनाला भावल्यामुळे हा अभंग मला खूप आवडला आहे. | २ |
| | **(ii) औक्षण** | |
| | **(१) कवी/कवयित्री : –**<br>इंदिरा संत | १ |
| | **(२) कवितेचा रचनाप्रकार : –**<br>'औक्षण' ही कविता एक 'भाव कविता' आहे. | १ |
| | **(३) कवितेचा काव्यसंग्रह : –**<br>'औक्षण' ही कविता 'इंदिरा संत यांची समग्र कविता' या संग्रहातून घेतली आहे. | १ |
| | **(४) कवितेतून व्यक्त होणारा भाव (स्थायी भाव) : –**<br>'औक्षण' या कवितेतून 'उत्साह' हा स्थायी भाव दिसून येतो. | १ |
| | **(५) कवितेतील आवडलेली ओळ : –**<br>जीव ओवाळावा तरी<br>जीव किती हा लहान;<br>तुझ्या शौर्यगाथेपुढे<br>त्याची केवढीशी शान; | २ |
| | **(६) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे : –**<br>'औक्षण' ही 'इंदिरा संत' यांची कविता मला खूप आवडली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे कवयित्रीचे चित्रदर्शी वर्णन. त्यांच्या शब्दांमधून युद्धभूमीवरचे चित्र हुबेहूब डोळ्यांसमोर उभे राहते. युद्धभूमीवर शत्रूशी लढायला जाण्यासाठी सज्ज झालेल्या आपल्या जवानाचे औक्षण करताना कवयित्रीच्या मनात आलेल्या भावना या केवळ तिच्या भावना नाहीत तर त्या प्रत्येक भारतीयाच्या भावना आहेत. डोळ्यातील आसवे, असंख्य ज्योती अशा प्रतिमा वापरून अपेक्षीत परिणाम त्यांनी साधला आहे. | २ |

उ.२ (इ) **खालील ओळींचे रसग्रहण करा.** ४

वरील काव्यपंक्ती 'योगी सर्वकाळ सुखदाता' या अभंगातून घेतल्या आहेत. संत एकनाथांनी पाण्याची आणि योग्याची तुलना करून 'योगी सर्वश्रेष्ठ आहे,' हे पटवून दिले आहे.

तहान लागली की आपण पाणी पितो. क्षणात आपली तहान भागते. आपल्या मनाची तृप्ती होते. पण पुन्हा काही वेळाने तहान लागतेच. पाणी काही काळच तृप्तता देऊ शकते ही त्याची मर्यादा आहे. पण योग्याचे कर्तृत्व अमर्यादित आहे. त्यांच्या शिकवणीने, उपदेशाने लोकांना चिरकाल टिकणारा आनंद मिळतो. जे सुख कमी होत नाही किंवा संपतही नाही, असे सुख प्राप्त होते. म्हणजेच सुखाला तेथे विकृती नसते. नित्य, चिरकाल समाधान व आनंद देणारे हे योगी समाजासाठी कायम वरदानच असतात.

तृप्तीची संकल्पना काव्याचे सौंदर्य वाढविते. स्वानंद तृप्ती, विकृती या शब्दांनी आंतरिक लय वाढून भाषिक सौंदर्य वाढलेले दिसून येते.

## विभाग – ३ : स्थूलवाचन

उ.३ **खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.**

(१) सूर्य म्हणजे पृथ्वीचा कर्ता तिच्यावरच जीवनचक्र चालवणारा, फुलवणारा, चराचराचा निर्माता, प्रचंड शक्तीचे प्रतिक. आपण निर्मिलेल्या या पृथ्वीवरच्या जीवनाचे आपल्या अनुपस्थितीत कोणीतरी रक्षण करावे यासाठी मनापासून, कळवळून साद घालणारा तो व्याकूळ जनक किंवा निर्माता आहे असे वाटते. एखाद्याच्या भल्यासाठी, कल्याणासाठी जर विनवणी करायची असेल तर आपण कितीही शक्तीशाली व ताकदवान असू तरी आपल्याला विनम्रता धारण करावी लागते. सामर्थ्याचा अहंकार बाजूला ठेवून दयाभाव व करूणा ह्रद्यात निर्माण करावी लागते. सहृदयता ठेवून काही काम करू लागल्यावर काहीतरी चांगले, श्रेयस आपल्या हाती नक्कीच लागते हे सूर्याच्या प्रतिकातून दिसून येते. त्या उलट, पणती म्हणजे सूर्यासमोर प्रकाशाचा एक छोटाशा कवडसा. पण सूर्याच्या विनवणीला उत्तर देण्याचे धाडस ती करते. तिच्यातला आत्मविश्वास तिला बोलण्याची हिम्मत देतो. जर इच्छा प्रबळ असली आणि सकारात्मक दृष्टीकोन ठेवून कामाला सुरुवात केली तर काहीही अशक्य नाही हे पणतीच्या प्रतिकातून जाणवते. त्याचबरोबर अगदी छोट्या जीवातही जगाला काहीतरी देण्याची. जग सुंदर करण्याची क्षमता असते हे सुद्धा पणतीच्या प्रतीकातून जाणवते. ३

(२) सग्वारो कॅक्टस वाळवंटी प्रदेशाचा अगदी खास प्रतिनिधी आहे.कॅक्टसच्या अनेक जातींमध्ये सग्वारो हा कॅक्टसचा राजा मानलाजातो. तो ५० फूट उंचीपर्यंत वाढतो. त्याची वाढ मंद असतेइतकी, की ५० वर्षात तो फक्त ३ फूट वाढतो आणि २०० वर्षेजगतो. सग्वारो कॅक्टसची फुले गेंदेदार असतात ही फुले फुललीकी थोडा काळ तरी ओसाड वाळवंट सौंदर्यपूर्ण होते. सग्वारोकॅक्टसला फळे येतात. त्यातील गर कलिंगडासारखा असतो.सग्वारो कॅक्टस हात वर करून उभ्या राहिलेल्या एखादया मोठ्याबाहुल्यासारखा दिसतो. ३

सग्वारो कॅक्टसचा उपयोग अमेरिकेतील रेड इंडियन करीतअसत. अवर्षणाच्या काळात कॅक्टस चेचून ते त्याचे पाणी काढतआणि तहान शमवण्यासाठी हे पाणी पीत. सग्वारो कॅक्टसची फळेही कलिंगडाच्या गरासारखी असल्याने खाण्यासाठी उपयोग होतो.फळाच्या गरात साखर घालून तो मोरावळ्यासारखा टिकवता येतो.रेड इंडियन लोकांचे हे ही एक खाद्य असते.

(३) लेखक बार्क संस्थेत ट्रेनिंग स्कूलला गेले होते. तेव्हा ती संस्था सुरू होऊन जेमतेम सात वर्षे झाली होती. लेखक ट्रेनिंग स्कूलला असताना होमी भाभा तीन-चार वेळा तेथे आले होते. एकदा लेखकांनी त्यांना विचारलं, ''आम्ही इतकी मुलं-मुली आहोत; पण सर्वांना पुरेल इतकं काम कुठे आहे इथे?" तेव्हा ते म्हणाले. ''तुम्ही त्याची काळजी न करता सर्वजण संशोधन करा. त्यासाठी सरकारला किती खर्च येतो याचा आता विचार करू नका. तुम्ही स्वत:च काम निर्माण करा. बॉसने सांगितले तेवढचं काम करायचं आणि सांगितलं नसेल तर आपल्याला कामच नाही असं समजायचं, हे चूक आहे. ही प्रवृत्ती गेली पाहिजे". ३

भाभांनी सांगितलेल्या या मुद्द्यातून लेखकांनी स्वत:च स्वत:ला सक्षम बनवले. त्यातूनच त्यांना ऊर्जा मिळवता आली आणि स्वत:चे मार्ग शोधता आले. यावरूनच लेखकांना कळले की आकाशाला कितीही मोठी पोकळी असली तरी आपण स्वत:चा मार्ग स्वत:च कोणाचाही आधार न घेता सततच्या प्रयत्नाने शोधला तर तोही मिळतोच. अशावेळी 'स्काय इज द लिमिट' अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

## विभाग – ४ : भाषाभ्यास

**प्र.४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**(१) समास** २

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | भाजीपाला | भाजी, पाला वगैरे | समाहार द्वंद्व समास |
| (ii) | मायलेक | माय आणि लेक | इतरेतर द्वंद्व समास |

**(२) अलंकार** २

**खालील उदाहरण वाचून कृती करा.**

हा आंबा म्हणजे साखरच जणू!

| उपमेय | उपमान | साम्यवाचक शब्द | समान धर्म (गुण) |
|---|---|---|---|
| आंबा | साखर | जणू | – – – – |

**(३) वाक्यरूपांतर** २

**कंसातील सूचनेनुसार कृती करा.**

(i) म्या भिकाऱ्याला शाली शोभणार नाहीत.

(ii) तुझ्या शाळेत मराठी भाषा दिन साजरा कर.

**(४) सामान्यरूप** २

**खालील शब्दांचे सामान्यरूप व विभक्ती प्रत्यय लिहून तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय |
|---|---|---|---|
| (i) | पावसात | पावसा | त |
| (ii) | दसऱ्याचा | दसऱ्या | चा |

**(५) वाक्प्रचार** २

**कंसातील वाक्प्रचारांचा योग्य उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा**

**(i)** अचानक दारात मामा मामींना बघून सर्वांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

**(ii)** मानसीचे कौतुक ऐकून मला क्षणभर तिचा हेवा वाटला.

उ.४ **(आ) भाषासौंदर्य**

**(१) (i) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** १

(अ) कीर्तन करणारा - कीर्तनकार

(आ) केलेले उपकार विसरणारा - कृतघ्न

**(ii) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** १

(अ) तेज - प्रकाश (आ) सोबती - स्नेही, मित्र

**(iii) पुढील शब्दांचे दोन अर्थ लिहा.** १

नवरा ← वर → आशीर्वाद

**(iv) खालील शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा. ('जवळ व पास' हे शब्द सोडून)** १

जवळपास - वळ, पाळ, पाव, सजव

**(२) लेखननियमानुसार लेखन -**

**(i) खालील वाक्ये लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** १

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा संमेलने गाजवत.

**(ii) अचूक शब्द ओळखून लिहा.** १

(अ) निर्मिती

(आ) सामुहिक

| | | |
|---|---|---|
| | **(३) विरामचिन्हे**<br>**खालील वाक्यातील चूकीची विरामचिन्हे वाक्ये पुन्हा लिहा.**<br>**(i)** कुठं चिरण्या नाहीत की काही नाही!<br>**(ii)** तुम्हां टेक्नोसॅव्ही लोकांना कशाचंही ॲप करण्याशिवाय काही सुचतं की नाही? | २ |
| | **(४) पारिभाषिक शब्द -**<br>**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.**<br>**(i)** Yard - आवार **(ii)** Translator - अनुवादक | १ |
| | **(५) भाषिक खेळ -**<br>**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.**<br>औषध, दवाखाना, परिचारिका, रुग्णालय | १ |
| | **विभाग – ५ : उपयोजित लेखन** | |
| उ.५ | **(अ) (१) पत्रलेखन**<br>**खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**<br>दिनांक : ३० एप्रिल, २००८<br><br>प्रति,<br>मा. संचालक,<br>श्री. विनय गायकवाड,<br>२, सोमवार पेठ,<br>कराड.<br>विषय : सुलेखन वर्गात प्रवेश मिळण्याबाबत...<br>माननीय महोदय,<br>सप्रेम नमस्कार,<br>मी अ.ब.क. शिवछत्रपती विद्यालय कराड या शाळेत इयत्ता ९ वी मध्ये शिकणारी विद्यार्थिनी आहे पुढील शैक्षणिक वर्षात मी इयत्ता १० वी मध्ये जाणार आहे. माझे मराठी विषयाचे अक्षर म्हणावे तसे वळणदार नाही. मला येत्या शैक्षणिक वर्षात चांगले गुण हवे आहेत. तेव्हा आपण आपल्या मराठी भाषेच्या लेखनासाठी काय उपाय करू शकतो. या विचारात असतानाच आज अचानक आमच्या शाळेत आपल्या ॲकॅडमी तर्फे येत्या उन्हाळ्याच्या मे महिन्यात १ मे ते ३१ मे या कालावधीत सुलेखन वर्गाचे आयोजन केल्याची जाहिरात पाहिली.<br>ही माझ्यासाठी एक सुवर्णसंधीच म्हणावी लागेल. आता निश्चितच माझे हस्ताक्षर चांगलेच सुधारेल अशी आशा वाटते. तेव्हा मी आपणांस विनंती करते की, आपण मला या वर्गात प्रवेश देऊन माझे अक्षर सुधारण्याची संधी द्यावी. | ५ |

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपली कृपाभिलाषी,

अ.ब.क.

शिवछत्रपती विद्यालय,

कराड.

**(२) सारांश लेखन** ५

**विभाग - १ गद्य विभागातील प्र. १ इ मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

सगळी मनुष्यजात एक आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यांच्या पायावर उभे असलेले कुटुंब निर्माण करणे हे मनुष्यत्वाचे ध्येय आहे. शेतकी, कला-कौशल्य, मजुरी अशा कामांमुळे मनुष्याला थोरपणा येतो. या कामांमधूनच सृष्टीचा स्वर्ग आपण बनवू शकतो. आपल्या अस्तित्वाकरता किंवा जगण्याकरता वस्तू उत्पन्न करणे किंवा मिळवणे त्यासाठी एकमेकांना सहकार्य करणे हाच मनुष्याचा श्रेष्ठ धर्म असून तीच ईश्वरपूजा आहे.

उ.५ **(आ) खालील कृती सोडवा.**

**(१) बातमी लेखन** ६

**आमच्या वार्ताहराकडून** **दिनांक: २० मार्च, २०१८**

**प्लास्टिक बंदी**

काल (१९ मार्च) राज्य सरकारने सर्व राज्यभर प्लास्टिक बंदी लागू केल्याची घोषणा केली. आमच्या प्रतिनिधींनी काही जबाबदार नागरिकांची भेट घेतली व त्यांची या विषयीची मते व प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. नागरिकांनी आपल्या प्रतिक्रियांमध्ये आनंद, नाराजी व चिंता व्यक्त केली.

प्लास्टिकमुळे प्रदुषणात वाढ झाल्याने नागरिकांच्या व शहरांच्या स्वास्थ्याबाबत व स्वच्छतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्याचे उत्तर या बंदीने मिळाल्याचे काही नागरिक म्हणाले.तसेच प्लास्टिकपासून होणाऱ्या हानीबाबत जनतेचे प्रबोधन करायला हवे, जागरूकता निर्माण व्हावी असेही जाणकार म्हणतात. सरकारचा निर्णय योग्यच आहे. 'देर आये दुरूस्त आये" असे त्यांचे म्हणणे आहे. व्यापारी वर्गात नाराजी व चिंता दिसून आली. सरकारने प्लास्टिकला पर्याय न देताच तडका फडकी बंदी लागू केल्याने धंदा मंदावला असे त्यांचे म्हणणे आहे.

सरकारच्या आरोग्य खात्याने याची गंभीर दखल घेऊन, कायद्यातील तरतुदींचा विचार करूनच अंमलबजावणी करावी, असेही काही नागरिकांनी सुचवले आहे.

(२) **कथा लेखन** ६

**लोभी माणूस**

रामपूर गावामध्ये सोहनलाल नावाचा एक सावकार राहत होता. तो अतिशय लोभी होता सोन्याची तर त्याला विशेष आवड होती. एके दिवशी गावात एका साधूचे प्रवचन होते. प्रवचनात साधुमहाराजांनी सांगितले की, 'आपण जर मनापासून परमेश्वराची भक्ती केली तर परमेश्वर आपल्या सर्व इच्छा पूर्ण करतो'. सोहनलाल हे ऐकून खूपच खूश झाला. त्या दिवसापासूनच परमेश्वराची भक्ती करू लागला. दिवस रात्र अगदी मनापासून परमेश्वराच्या भक्तीत तो रंगून जाऊ लागला असे बरेच दिवस निघून गेले.

याची भक्ती पाहून एके दिवशी परमेश्वर त्याच्यावर प्रसन्न झाला. परमेश्वराने त्याला दर्शन दिले आणि सांगितले, ''माग तुला काय हवे ते?" परमेश्वराचे हे शब्द ऐकताच सोहनलालचा लोभीपणा जागृत झाला. आणि तो परमेश्वराला म्हणाला, ''माझ्या झोळीत भरपूर सोन्याची नाणी टाक". परमेश्वराने त्याची मागणी मान्य करताना त्यास सांगितले, ''नाणी जर जमिनीवर पडली तर त्याची माती होईल.''"लोभीपणामुळे सोहनलालने त्याकडे लक्ष दिले नाही.

परमेश्वर सोहनलालच्या झोळीत सोन्याची नाणी टाकू लागला. हळूहळू संपूर्ण झोळी सोन्याच्या नाण्यांनी भरून गेली. तरीही सोहनलाल देवाला 'मला अजून सोन्याची नाणी दे'', असे सांगत होता आणि अचानक सोन्याची नाणी झोळीत जास्त झाल्याने झोळी फाटली आणि सर्व नाणी जमिनीवर पडून त्यांची माती झाली. हे पाहताच सोहनलालला अतिशय दु:ख झाले आणि त्याचवेळेला परमेश्वरही अंतर्धान पावले.

उ.५ (इ) **लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.(शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)**

(१) **मला देव भेटला तर ........** ८

देव जरी मज कधी भेटला,
माग हवे ते माग म्हणाला,
म्हणेन प्रभू रे माझे सारे,
जीवन देई मम बाळाला ।

चित्रपटातील हे सुमधुर गीत आकाशवाणीवर ऐकताना माझ्या मनात अशी रम्य कल्पना स्फुरली की खरोखरच मला देव भेटला तर काय बहार येईल... तेवढ्यात आवाज आला, 'तथास्तु''.

मी क्षणभर अवाक्‌च झालो, क्षणभर सुचेना, काय करावे? देव तर प्रत्यक्ष समोर मंद हास्य करत उभे राहिलेले. मला गोंधळलेले पाहून हसतच म्हणाले, 'बोल वत्सा, काय हवंय तुला?'' त्यांच्या दिव्य तेजाने मी दीपून गेलो. थोडे सावरताच मनातील सर्व प्रश्न विचारू लागलो, 'देवा, आम्ही सगळी तुझी लेकरे असताना समाजात अशी विषमता, भेदभाव का? कोणी काळा, कोणी गोरा तर कोणी श्रीमंत तर कोणी गरीब का? का सगळे स्वार्थासाठी आपापसात भांडतायत, एकमेकांचा जीव घेतायत, सांग देवा, सांग, हे असं का?

देव गालातल्या गालात हसतच मला म्हणाले, 'अरे मूढा! मी फक्त माणूस घडवला पण भेद तर तुम्हीच निर्माण केलेत. तुम्हीच एकमेकांच्या जीवावर उठलात. परंतु त्याचे खापर मात्र तुम्ही माझ्या डोक्यावर फोडताय. अरे! मी दगडरूपी मूर्तीत नाही तर हृदयरूपी देव्हाऱ्यात वसतो. मी संगमरवरी मंदिरात नाही तर कष्टकऱ्यांच्या शेतात राहतो. घंटानादाच्या निनादात नाही तर तुमच्या मेहनतीत रमतो. पण तुम्हीच मला देव्हाऱ्यात कोंडलय, स्वत:च्या फायद्यासाठी. श्रम न करता तुम्हांला सगळं हवं म्हणून तुम्ही नवस बोलता, वेळेला लाच देण्याचा प्रयत्न करता. मी तुम्हांला जन्माला घातलं ते या सुंदर सृष्टीमध्ये नंदनवन फुलवण्यासाठी पण त्याठिकाणी तुम्ही अनेक धर्म निर्माण केले. त्यासाठी वेगवेगळ्या रूपात येऊन मी तुम्हांला मार्गदर्शन केलं. तुम्ही त्याचा स्वार्थासाठी उपयोग करताय हा काय माझा दोष आहे? म्हणजे तुमचं हे बरं आहे.''

'विनाशकाले विपरित बुद्धी'' या उक्तीप्रमाणे मानवाने स्वत:च आपला विनाश ओढवून घेतला आहे. जन्मदात्या मातेला ती स्त्री आहे म्हणून अधर्माने तिच्या प्रगतीला अडविले आहे. स्पृश्य-अस्पृश्यतेच्या भिंती उभ्या केल्या, मंदिर-मस्जिद वाद रंगविले. नाव मात्र दिलेत धर्माचे पण बदनाम केलेत ते देवाला. सुखात नाही तर फक्त दु:खात देवाची तुम्हांला आठवण येते. स्वार्थासाठी अगदी आमची विटंबना करायलाही तुम्ही धजावता. सत्तेच्या लोभापायी युद्ध करता. शांततेसाठी व विकासासाठी दिलेली अणुऊर्जा विनाशकारी बॉम्ब बनवण्यास वापरून प्रचंड जीवितहानी घडवून आणता. अगदी स्टार वॉरची योजना आखता व मौल्यवान खनिजांचा दुरूपयोग करता. पण लक्षात ठेवा, यात विनाश तुमचाच आहे. वाढत्या जागतिक तापमानाची दखल घ्या नाहीतर विनाश अटळ आहे.

'नको मंत्र मला मुनीब्राह्मणांचे, मला आवडे गीत श्वासाघणांचे
वसतो सदा मी स्वेद गंगेकिनारी, जिथे राबती हात तेथे हरी ।''

''तेव्हा स्वार्थी माणसा जगाच्या कल्याणासाठी स्वार्थ सोडून दे." एवढं बोलून देव मला प्रश्नांच्या गर्तेत लोटून अंतर्धान पावले.

'तोचि करता आणि करविता' या उक्तीप्रमाणे त्या देवावरच सगळं सोपवून मी समर्थांच्या ओळी मनात घोळवू लागलो,

'राघवाचा धर्म जागो, अधर्म रे भागो,
अज्ञान निरसुनिया, विज्ञान लक्ष लागो।।'

(२) **विदूषकाचे आत्मवृत्त** ८

'डोळ्याभोवती मोठे पिवळे वेटोळे. लालचुटूक नाक, डोक्यावर लांब टोपी, अंगावर सैलसर चट्ट्यापट्ट्यांचा पोशाख, काय मंडळी ओळखलंत का मी कोण आहे ते? होय, अगदी बरोबर ! तुम्हांला हसवणारा, तुम्हाला आवडणारा मी सर्कशीतला विदूषक आहे.

आत्मकथन म्हटलं की साहित्यिक, राजकारणी, समाजसेवक सहज डोळ्यासमोर येतात. पण तुम्ही कधी आमच्या आयुष्यात डोकावून बघितलं आहे का? नाही ना. चला तर, मी तुम्हांला माझ्या आयुष्याची सफर घडवून आणतो."

'मी एका गरीब कुटुंबात जन्माला आलो. गरीब वस्तीत वाढल्यामुळे मला समाजातल्या सर्व स्तरातल्या लोकांना पाहता आले. याचाच परिणाम की काय मी हळूहळू अनेकांच्या नकला करायला लागलो. चौथीपर्यंत कशीबशी शाळा झाली. पुढे घरची परिस्थिती शिक्षण घेऊ देईना म्हणून छोटी-मोठी कामे करायला सुरूवात केली. ज्या लहान वयात बागडायचं, खेळायचं, हसायचं, त्या वयात मी डोक्यावर कुटुंबाचा भार वाहत होतो. खेळणारी, बागडणारी, हसणारी मुले बघितली की, मन विषण्ण व्हायचं. पण या अनुभवाने मला जगाकडे बघण्याचा नवीन दृष्टिकोन मिळाला. मनाशी ठरवलं आपल्या हसण्याखिदळण्याच्या वयात जे जमलं नाही त्यापासून इतरांना वंचित होऊ द्यायचं नाही. माझा एक मित्र सर्कशीत काम करत होता. त्याने मला विचारले, 'तू सर्कशीत काम करशील का ?' मी तात्काळ 'हो" म्हटलं."

'तोंडाला रंग लागला. तंबूवर दिव्यांची रोषणाई झळकू लागली. तंबूत लोकांची गर्दी जमा झाली, वाद्यवृंद सुरू झाला आणि माझा विदूषकाचा डाव सुरू झाला. त्या दिवसापासून ते आजपर्यंत प्रत्येक खेळाला बदलणारे दर्शक दिसतात पण आम्ही मात्र तेच असतो. त्याच कसरती पण हशा मात्र नवा असतो. घोड्यावर उलटं बसणं, चित्रविचित्र बोलणं, कोलांटी उडी मारणं आणि नकला करणं हा माझ्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. सुरूवातीला काम म्हणून मी माझ्या पेशाकडे पाहायचो. पण आता लोकांना हसवणं माझा छंद बनला आहे. आपण आपल्या लहानपणी हरवलेलं 'हसू" जेव्हा मी लहानथोरांच्या चेहऱ्यावर पाहतो, तेव्हा माझा आनंद गगनात मावेनासा होतो."

'आमच्या जीवनाचे सूत्र आहे, 'Show must go on'. तुम्हाला बरं असो वा नसो, घरात एखादा बिकट प्रसंग असो, वेदना मुखवट्यामागे लपवाव्या लागतात आणि चेहरा हसरा ठेवून 'हसण्यासाठी" आलेल्या जनतेला मनमुराद हसवावं लागतं. एकदा माझ्या खेळादरम्यान माझ्यापर्यंत एक निरोप पोहोचला. निरोप असा होता की, माझ्या घरी माझ्या आईचा मृत्यू झाला होता. बातमीने वेदनेची कळ हृदयात उमटली, खेळ अर्धवट सोडून जायचं की नाही, या द्विधा मन:स्थितीने मी ग्रासलो होतो. शेवटी ठरवलं हा आयुष्याचा खेळ आहे, चालू राहिलाच पाहिजे. मी रडत होतो, माझ्या हालचाली संथ होत होत्या, लोकांना मात्र वाटत होते की, हा विदूषकाच्या कसरतीचाच एक भाग आहे. लोक खो-खो हसत होते. त्यांच्या हसण्याने माझ्या काळजाच्या जखमेला औषध मिळालं.

'हे असं क्षणभंगूर जिणं घेऊन आज इथे तर उद्या तिथे. तोच तंबू, तेच सहकारी, तेच प्राण्यांचे पिंजरे, पण बदलतो तो फक्त गाव. जेव्हा लोक उभे राहून टाळ्यांचा गजर करतात, वाटतं 'आपल्या कामाची हीच पावती आहे'. बरं आहे मंडळी, चला तुमची रजा घेतो. शिट्टी वाजली आहे. माझ्या 'entry' ची वेळ झाली आहे. नाटकं आणि सिनेमा तुम्ही नेहमीच पाहता. त्यात असणारे सारेच प्रसंग नाट्यमय आणि कृत्रिम असतात. अस्सल जीवनाला जवळून पाहण्यासाठी, मला भेटण्यासाठी एकदा नक्कीच आमच्या सर्कशीला भेट द्या. याल ना ?

❖❖❖❖❖